ePaper
| वर्ष - 7 | अंक - 165 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | रविवार, दिनांक 22 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# "देवेंद्र फडणवीस खोटं बोलतायत"; त्यांनी माफी मागावी: रोहित पवार



## आतील पानांत

- क्लासेनची 'क्लासिक' धुलाई!
- अखिलेश यादव काँग्रेसवर भडकले!
- स्मृती इराणींवर काँग्रेसचा हल्लाबोल!
- मनोज जरांगेंच्या मागणीला विरोध!

# घसा जंतुसंर्गाचा 'उद्रेक'!

## » शहरातील मनपा रुग्णालयात 30 टक्के रुग्ण : ऊन आणि थंड वातावरणाचा परिणाम

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये 30 टक्के रुग्ण यावर उपचार घेण्यासाठी दाखल होत आहेत. ऊन आणि थंड वातावरणाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर जाणवत आहे. परिणामी घशाचा जंतूसंसर्ग होणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. योग्य वेळी उपचार घेतल्यास रुग्ण त्वरीत बरे होत आहेत.**

पाण्याद्वारे आणि खराब हवेद्वारे घशाचा संसर्ग होत आहे. घशाच्या दोन्ही बाजूला टॉन्सिल्स असतात. ते घशाची सुरक्षा करतात, पण जेव्हा बॅक्टेरियल किवा व्हायरलचा हल्ला होतो तेव्हा टॉन्सिल्सला सूज येते. त्याने वेदना व खवखव वाढते. सुरूवातील आयुर्वेदिक घरगुती औषधोपचाराने घशाचा संसर्ग कमी करण्यासाठी नागरिक प्राधान्य देत आहेत.

मात्र रुग्ण बरे झाले नाहीत तर ताप, अंगदुखी देखील सामोरे जावे लागत आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सध्या 30 टक्के रुग्ण या त्रासाचे येत असल्याचे रुग्णालयाच्या वतीने सांगण्यात येत आहे. वेळीच उपचार घेतल्यास तीन ते पाच दिवसात रुग्ण बरे होत आहेत.

घशाला जंतुसंसर्ग झाल्यास घसा दुखायला सुरू होतो. काही काही वेळा हा संसर्ग इतका तीव्र असतो की कुठलाही पदार्थ गिळताना त्रास होतो.

काही जण सुरूवातीला साधे घरगुती उपाय देखील करत आहेत. मात्र त्यामध्ये बरे न वाटल्यास उपचारासाठी रुग्णालयाची वाट धरत आहेत. त्यामुळे वेळीच उपचार घेण्याचे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञ करत आहेत.



### हे आहेत लक्षणे ?

- » घसा दुखणे.
- » गिळायला त्रास होणे.
- » खवखव वाढणे.
- » खोकला येणे.
- » घसा जड होणे.
- » वेदना होणे.



### ...ही काळजी घ्या!

» उन्हात जाणे टाळणे, अधिक पाणी पिणे, सात्वीक घरचे अन्न खाणे. बाहेरचे तेलकट खाणे टाळणे. घसा दुखू लागल्यास गरम पाण्याने गुळण्या करणे. डॉक्टरांशी संपर्क साधून औषधोपचार घेणे.

# किल्लारीचा भूकंप आणि पिंपरीची भूमिका!

## » खा. शरद पवार यांनी पिंपरी दौऱ्यात सांगितली आठवण

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"मी मुख्यमंत्री असताना लातूरमधील किल्लारीला भूकंप झाला. सकाळी सात वाजता किल्लारीला पोहोचलो. एक लाखापेक्षा जास्त घरे उद्ध्वस्त झाली होती. मोठे संकट होते. या संकटाला लोकांनी मोठी मदत केली. कोणतेही संकट आल्यानंतर आपले कर्तव्य समजून महाराष्ट्रातील लोक पुढे येतात. त्यामध्ये जैन समाज कटाक्षाने पुढे येतो. यातूनच शांतीलाल मुथा यांनी भूकंपग्रस्तांच्या 1200 मुलांची जबाबदारी घेतली होती. ते सर्व जण आता विविध क्षेत्राय कार्यरत असल्याची आठवण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनी सांगितली.**

शिक्षण महर्षी स्व. शंकरलालजी जोगीदासजी मुथा यांचा चिंचवड येथील श्री जैन विद्या प्रसारक मंडळाच्या कॅम्पसमध्ये उभारण्यात आलेल्या पुतळ्याचे अनावरण माजी केंद्रीय कृषीमंत्री खासदार पवार यांच्या हस्ते शनिवारी (दि.21) करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. खासदार श्रीनिवास पाटील, खासदार श्रीरंग बारणे, शिरूरचे आमदार अशोक पवार, मंडळाचे अध्यक्ष प्रकाशचंद धारीवाल आदीसह सर्व पदाधिकारी, विश्वस्त, कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले की, देशाचे माजी राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग, शंकरदयाळ शर्मा यांनी या संस्थेला भेट दिली. श्री जैन विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व क्षेत्रातील शाखा आहेत. आमच्या बारामतीच्या संस्थेत 30 हजार विद्यार्थी आहेत.

महाराष्ट्रात अनेक शैक्षणिक संस्था उभ्या आहेत. अनेक तालुका, जिल्हा ठिकाणच्या संस्था उत्तम काम करतात. अलीकडे शिक्षण संस्थेत सुद्धा दोन भाग झाले आहेत. शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करायची म्हणून संस्था उभ्या केल्या आहेत. समाजाला उभारण्यासाठी, हातभार लावावा या हेतूने संस्था उभारणारा दुसरा वर्ग आहे. यामध्ये जैन समाजातील लोकांचा अतिशय मोलाचा वाटा आहे.



### आयटीच्या निर्मितीवर भाष्य...

» हिंजवडीला साखर कारखाना काढायचा होता. मी कारखान्याचे भूमीपूजन केले आणि भाषणात सांगितले येथे कारखाना होणार नाही. हिंजवडीऐवजी दुसरी जागा दिली. हिंजवडीत आयटी सुरू केले. सध्या हिंजवडी गेल्यावर परदेशात आल्याचा प्रत्यय येतो. लाखो लोकांच्या हाताला काम मिळाला असल्याची आठवण खा. पवारांनी सांगितली.

# गॅस कटिंग करताना भोसरीतील बंद पडलेल्या कंपनीला आग

। पिंपरी ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

भोसरी येथील लांडेवाडी परिसरातील औरा आईस अँड कोल्ड स्टोरेज फॅक्टरीला शनिवारी (दि. 21) दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या तीन मजली फॅक्टरीला आग लागल्याने वर काम करत असलेल्या कामगारांनी खाली उड्या मारल्या. यामध्ये एकजण गंभीर जखमी झाला असून एकजण किरकोळ जखमी झाल्याची घटना घडली आहे.

जखमी कामगारांना वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. औरा आईस अँड कोल्ड स्टोरेज ही फॅक्टरी गेले पाच वर्ष बंद असून त्या आधी 30 वर्ष ही कंपनी अस्तित्वात होती. या कंपनीच्या भिंतीवर अपग्रेडिंगचा बोर्ड देखील लावण्यात आला आहे. या बंद फॅक्टरीचे डिमॉलिशन करण्याचे काम चालू असताना गॅस कटिंग करताना बंद कोल्ड स्टोरेज रूमच्या फोमला आग लागली असल्याचे समोर आले आहे. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या दोन गाड्या व 12 ते 14 कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली. पोलीस प्रशासन देखील घटनास्थळी हजर झाले.



# हल्ली पाच पाच पुणे झाले आहेत!

## » पुणे बरबाद व्हायला वेळ लागणार नाही : राज ठाकरे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहर नियोजनाविषयी परखड शब्दांत भाष्य करताना राज ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडलं. सत्ताधाऱ्यांची दृष्टी असेल, तर शहराच्या नियोजनात ती प्रतिबिंबित होते, असं सांगतानाच राज ठाकरेंनी मुंबई व पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीविषयी भाष्य केलं.**



मुंबईतील रस्ते बांधून बाहरच्यांसाठी सोय करताना तिथल्या नागरिकांची गैरसोय होत आहे, असं म्हणतानाच राज ठाकरेंनी पुणे शहर बरबाद व्हायला वेळ लागणार नाही, अशी स्पष्ट भूमिका यावेळी मांडली. पुण्यात एका कार्यक्रमात त्यांची जाहीर मुलाखत घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. "प्रत्येकानं आपापला परिसर स्वच्छ ठेवला तरी अनेक गोष्टींमध्ये समाधान मिळेल. माझा विचार फक्त एवढाच होता की मला घरातून बाहेर पडल्यावर मी एका चांगल्या शहरात जगतोय असा मला फील आला पाहिजे. तर त्या जगण्याला अर्थ आहे. धक्के खातोय, फुटपाथवर पाय मुरगळतायत, खड्ड्यातून गाड्या जातायत याला जगणं म्हणत नाही. तुमचा जन्म झालाय म्हणून तुम्ही जगताय. इथल्या अनेक तरुण-तरुणींना परदेशात सभोवतालच्या याच वातावरणासाठी परदेशात जायचंय", असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

कालच बातमी आली की मुंबई-पुण्यात प्रदूषणाचं प्रमाण वाढलंय. का? बेसुमार बांधकाम. मुंबईत कोस्टल रोड, उड्डाणपूल, रस्ते, इमारती बांधल्या जात आहेत. हे रस्ते कुणासाठी बांधले जात आहेत? ही मुंबई शहर वा उपनगरात राहणाऱ्या लोकांनी ही लोकसंख्या वाढवलेली नाही. बाहेरून येणाऱ्या लोकांच्या सोयीसाठी तुम्ही तिथे राहणाऱ्या लोकांच्या सर्व सोयी घालवून बसताय", असंही राज ठाकरेंनी यावेळी नमूद केलं. मी गेल्या २५ वर्षांपासून पुण्यात येतोय. मी हजार वेळा सांगितलंय. मुंबई बरबाद व्हायला काळ गेला, पुणं बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. आज पुणे कुठे राहिलंय? इथे पाच पाच पुणे आहेत. हिंजवडीकडचं पुणे वेगळं, इकडचं पुणं वेगळं, नदीकाठचं पुणं वेगळं, विमाननगरचं पुणं वेगळं.. कुणाचा कशाला काही संबंधच उरलेला नाहीये. पुणं म्हणून कुठे काही राहिलंय? याचं कारण राज्यकर्त्यांचं लक्ष नाहीये", अशा शब्दांत राज ठाकरेंनी पुण्यातील परिस्थितीवर भाष्य केलं. दळणवळण आल्यानंतर सर्व गोष्टी बदलायला लागतात आजूबाजूच्या. हे राज्यकर्त्यांना कळलं पाहिजे की याचं टाऊन प्लॅनिंग आत्ताच करायला पाहिजे. पण ते होत नाही. कारण ती व्यवस्थाच नाही. ज्यांना यातली काही माहिती नाही, त्यांच्याकडून तुम्ही काय अपेक्षा करणार? मग तुम्हाला महापालिका वा राज्य सरकारकडून हेच निकाल मिळणार. परवा कोकणातला ब्रिज कोसळला, कुणाला काही सोयरसुतक नाही. १५ मिनिटांची बातमी आली, विषय संपला", अशा शब्दांत राज ठाकरेंनी आपली नाराजी व्यक्त केली.

### आज पुणे कुठे राहिलंय?

» "प्रत्येकानं आपापला परिसर स्वच्छ ठेवला तरी अनेक गोष्टींमध्ये समाधान मिळेल. माझा विचार फक्त एवढाच होता की मला घरातून बाहेर पडल्यावर मी एका चांगल्या शहरात जगतोय असा मला फील आला पाहिजे. तर त्या जगण्याला अर्थ आहे. २५ वर्षांपासून पुण्यात येतोय. मी हजार वेळा सांगितलंय. मुंबई बरबाद व्हायला काळ गेला, पुणं बरबाद व्हायला वेळ लागणार नाही. आज पुणे कुठे राहिलंय? इथे पाच पाच पुणे आहेत. हिंजवडीकडचं पुणे वेगळं, इकडचं पुणं वेगळं, नदीकाठचं पुणं वेगळं, विमाननगरचं पुणं वेगळं.. कुणाचा कशाला काही संबंधच उरलेला नाहीये. पुणं म्हणून कुठे काही राहिलंय? याचं कारण राज्यकर्त्यांचं लक्ष नाहीये", अशा शब्दांत राज ठाकरेंनी पुण्यातील परिस्थितीवर भाष्य केलं.

# पूर्वप्राथमिक शिक्षणासाठीचा अभ्यासक्रम आराखडा!

## » बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी राज्य अभ्यासक्रम आराखड्याचा (पायाभूत स्तर) मसुदा राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने प्रसिद्ध केला. राज्य, राष्ट्र आणि जागतिक पातळीवरील प्रारंभिक संशोधन, शिक्षण क्षेत्राचा विस्तार, पायाभूत स्तरावरील बालकांचे शिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील पूर्वप्राथमिक स्तरासाठीची उद्दिष्ट्ये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती अशा मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे.**

भाषा शिक्षण आणि साक्षरतेबाबत दृष्टिकोन, अध्यापनशास्त्र, अध्ययन, वेळेचे व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे एनसीईआरटीने शालेय शिक्षणाचा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा प्रसिद्ध केल्यानंतर राज्याच्या अभ्यासक्रम आराखड्याकडे लक्ष लागले होते. शिक्षणाच्या प्रक्रियेत पूर्वप्राथमिक शिक्षण महत्वाचे आहे. त्यामुळे या मसुद्यात ० ते ८ वर्षांच्या बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली आहे. प्राथमिक शाळेत नावनोंदणी वाढली असली, तरी बालसंगोपन, बालशिक्षण कार्यक्रमातील नावनोंदणी अजूनही कमी आहे.



अंगणवाड्यांची व्यापकता असूनही पूर्व प्राथमिक शिक्षणातील नोंदणी कमी आहे. २०२१-२२मध्ये राज्यातील शासकीय आणि खासगी अनुदानित शाळेतील प्रवेशित १२ लाख ३३ हजार ४८० विद्यार्थ्यांपैकी केवळ ६८.४४ टक्के विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक शिक्षणाचा अनुभव होता. २०१९-२०मध्ये शहरी भागातील ५५.९ टक्के मुले, तर ग्रामीण भागात ६४.३ टक्के मुले, म्हणजे सरासरी ६०.३ टक्के मुले पूर्वप्राथमिक शाळेत जात असल्याची माहिती मसुद्यात देण्यात आली आहे. मसुद्याचा दस्तावेज ३४० पानांचा आहे. त्यात अभ्यासक्रमाची ध्येये, भाषा आणि साक्षरतेबाबत दृष्टिकोन, अध्यापनशास्त्राची तत्वे, खेळातून शिक्षण, साक्षरता आणि संख्याज्ञान, अध्ययन अध्यापन साहित्य, अध्ययन वातावरण, मूल्यांकन अशा घटकांचा मसुद्यात समावेश आहे. प्राथमिक स्तरावर जोडणारे दुवे, सहायक शैक्षणिक परिसंस्था निर्मिती, अतिरिक्त निर्णायक क्षेत्रे अशा विषयांबाबत सविस्तर माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मसुद्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची तत्त्वे नमूद करण्यात आली असून, अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. या मसुद्यात २०२५ पर्यत ३ ते ८ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला सुरक्षित, मोफत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याबाबत महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यासोबतच प्रारंभिक बाल्यावस्थेतील संगोपनालाही महत्त्व देण्यात आले आहे.

### सूचनांसाठी 27 नोव्हेंबरपर्यंत मुदत

» या मसुद्याबाबत सर्व समाज घटक, शिक्षक, पालक, शिक्षणतज्ज्ञ, शैक्षणिक प्रशासक आदींनी आपले अभिप्राय किंवा हरकती मागवण्यात आल्या आहेत. त्यासाठी २७ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. अभिप्राय, हरकती-सूचना SCFFSRESPONCES@MAA.AC.IN या ई-मेल आयडीवर किंवा पोस्टानेही पाठवता येतील. अधिक माहिती HTTPS://MAA.AC.IN/ या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

# शासकीय कंत्राटी भरतीपद्धती हे तर, काँग्रेस-उबाठा महाविकास आघाडीचे पाप!

## शंकर जगताप यांचा घणाघात: उबाठा प्रणित महाविकास आघाडी विरोधात निदर्शने

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील तरुणांची दिशाभूल करणारा आणि वेठीस धरणारा कंत्राटी नोकरभरतीचा 'जीआर' काँग्रेस आणि उबाठा प्रणित महाविकास आघाडीचे पाप आहे. २००३ पासूनच अशाप्रकारे कंत्राटी भरती सुरू केली होती. तो 'जीआर' राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द करण्याचा निर्णय घेतला. या पापाचा भांडाफोडच फडणीस यांनी केला. स्वत:च्या बगलबच्चे कंपनींना लाभ व्हावा. या हेतुने काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे या तीन पक्षांनी हा 'जीआर' लागू केला होता, असा घणाघात भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केला.**




राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात सुरू झालेल्या कंत्राटी भरतीचा भांडाफोड केल्यानंतर आज भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवडच्या वतीने शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे निदर्शने करण्यात आली.

यावेळी चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, शीतल शिंदे, संजय मंगोडेकर, अजय पाताडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, मा. नगरसेवक मोरेश्वर शेडगे यांच्यासह अनेक भाजपा कार्यकर्ते, नगरसेवक, पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

शंकर जगताप म्हणाले की,

> उबाठा प्रणित महाविकास आघाडी सरकारच्या काळात जानेवारी- २०२२ मध्ये कंत्राटी पद्धतीने शासकीय नोकरभरतीच्या 'जीआर'नुसार निविदा प्रक्रिया राबवली. तत्पूर्वी, २००३ पासून अशाप्रकारे नोकर भरती करण्याची पद्धती सुरु होती. मात्र, ही कंत्राटी पद्धत महायुतीचे सरकार आल्यानंतर मोडीत काढण्यात आली. उबाठा, काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी यांच्या निकटवर्ती कंपन्यांना कामे मिळावीत, या करिता ही पद्धत सुरू होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या महायुती सरकारने पदवीधर आणि तरुणांना दिलासा देणारा निर्णय घेतला. महाविकास आघाडीच्या काळातील पाप आता महायुती सरकारने धुतले आहे.
>
> **- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

राज्यातील तरुणांना शासकीय नोकरीपासून वंचित ठेवणाऱ्या काँग्रेस आणि उबाठा प्रणित महाविकास आघाडीचा आम्ही निषेध करतो. शासकीय विभागांमध्ये कंत्राटी पद्धतीने नोकरभरती करण्याबाबतचा 'जीआर' शरद पवार, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या सत्ताकाळात आला. मात्र, हीच मंडळी भाजपावर टीका करीत होते. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा भांडाफोड केला. यासाठी महायुती सरकार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राज्यातील जनतेच्या वतीने आम्ही आभार व्यक्त करतो. आगामी काळात भाजपावर चुकीच्या आरोप केल्यास, त्याचे सडेतोड उत्तर देण्यात येईल, असा इशाराही जगताप यांनी यावेळी दिला.

दरम्यान, शासकीय कंत्राटी नोकरभरतीबाबतच्या 'जीआर'ची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. तसेच, उबाठा आणि काँग्रेस यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

---

# चिखली- तळवडेतील प्रस्तावित रस्त्यांना 'गती'!

## आ. महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा : प्रशासनाकडून जागा ताब्यात घेण्यासाठी शिबीर

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली व तळवडेसह परिसरात वाहतूक कोंडी सोडवण्याच्या तब्बल ७ नवीन रस्त्यांच्या कामाला प्रशासनाने गती दिली आहे. रस्त्यासाठी जागा ताब्यात घेण्याचे आदेश पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले आहेत. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेने विशेष शिबिराचे आयोजन केले आहे.**

समाविष्ट गावांतील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला होता. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर काम प्रलंबित होते. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर आमदार लांडगे यांनी पुन्हा पाठपुरावा सुरू केला. राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाने पाठपुरावा सुरू केला होता. त्यानुसार, प्रशासनाने चिखली आणि तळवडेतील नवीन सात रस्त्यांना मंजुरी दिली. त्यानंतर आता येत्या दि. 26 आणि दि. 27 ऑक्टोबर रोजी चिखली-तळवडे गावठाण येथील महापालिका शाळेत या शिबिराचे आयोजन केले आहे.

चिखली, तळवडे परिसरात अरुंद रस्ते असल्यामुळे वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. नोकरदार, परिसरातील नागरिक सातत्याने होणाऱ्या या वाहतूक कोंडी विरोधात संताप व्यक्त करत आहेत. याबाबत. नागरिकांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे गाऱ्हाणे मांडून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी केली होती. त्यानुसार, आमदार लांडगे यांनी



> समाविष्ट गावांतील वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याबाबत आम्ही वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. चाकण औद्योगिकपट्टा, तळवडे आयटी पार्क या भागातून देहूरोड आणि अन्य भागात होणारी वाहतूक सक्षम करण्यासाठी तळवडे आणि चिखली गावाबाहेरून नवीन रस्ते प्रस्तावित केले आहेत. सुमारे १२ किलोमीटर नवीन पर्यायी रस्ते उपलब्ध झाल्यामुळे स्थानिक नागरिक आणि ग्रामस्थांना भेडसावणारा वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. प्रशासनाने भूसंपादन प्रक्रिया गतीमान करावी आणि लवकरच रस्त्यांच्या कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

पुढाकार घेतला. प्रशासनाकडे पर्यायी नवीन रस्त्यांची मागणी करण्यात आली. प्रशासनाने त्याबाबत सल्लागार नियुक्ती केली आणि त्यानंतर जागेची मार्किंग आणि आयडेंटिफिकेशन करण्यात आले. त्याला महापालिकेच्या संबंधित कमिटींची मान्यता मिळाली. आता जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. मौजे चिखली व तळवडे येथील मंजुर विकास योजनेतील ७ रस्त्यांसाठी जागा ताब्यात घेण्यासाठी कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. रस्ता बाधित नागरिकांची यादी तयार केली आहे.

### ...या रस्त्यांसाठी होणार भूसंपादन!

**1) चिखली येथील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपीठकडे जाणारा १२ ते १८ मीटर रुंद डीपी रस्ता (रस्त्याची लांबी १३७० मीटर). 2) चिखली येथील साने चौक ते चिखली गाव १२ ते २४ मीटर आणि ३० मीटर रुंद रस्ता (रस्त्याची लांबी २०३० मीटर). ३) चिखली येथील देहू आळंदी ते सोनावणे वस्तीकडे जाणारा ३० मीटर रुंद डीपी रस्ता (रस्त्याची लांबी २२५० मीटर). ४) चिखली येथील चिखली चौक ते सोनावणे वस्तीकडे जाणारा २४ मीटर रुंद रस्ता (रस्त्याची लांबी २ हजार मीटर). ५) तळवडे येथील त्रिवेणीनगर चौक ते तळवडे चौकापर्यंत २४ मीटर रुंद उर्वरित रस्ता (रस्त्याची लांबी ४०० मीटर). ६) तळवडे येथील तळवडे कॅनवे चौक ते निगडी स्पाईन रस्त्याला जोडणारा १८ मीटर डी.पी. रस्ता (रस्त्याची लांबी १९५० मीटर). ७) तळवडे येथील नदीच्या कडेने जाणारा १२ मीटर रस्ता व चिखली तळवडे शीवेवरील २४ मीटर रस्ता (रस्त्याची लांबी २१०० मीटर). असे रस्ते प्रस्तावित आहेत.**

# जगणे कठीण करणारी हवा..!



भूमिका

**मुंबईतील हवेच्या प्रदूषणामुळे मुंबईत मुखपट्टी लावणे बंधनकारक करण्याचे वृत्त जेवढे काळजीचे आहे, तेवढेच भविष्यातील संकटाची चाहूल सांगणारेही आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील आणि देशातील शहरांच्या प्रदूषणाचा प्रश्न सतत चर्चेत येत आहे. दिल्लीतील प्रदूषण हा तर तेथील नागरिकांसाठी अस्तित्वाचाच प्रश्न होऊ लागला आहे.**

तुम्ही कुठून आलात, कसे त्यामुळे येत्या काही वर्षांत वायुप्रदूषणाचा प्रश्न गांभीर्याने सोडवण्याचा प्रयत्न झाला नाही, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची दाट शक्यता आहे. पर्यावरणीय प्रदूषणाने या देशाला वेढले असून, वायू, जल, कचरा, प्लास्टिक यांच्या प्रदूषणाने ग्रासले आहे. अशा परिस्थितीत धड श्वासही घेता न येण्याची वेळ येणे, हे अधिकच त्रासदायक. गेल्या काही दिवसांत मुंबईतील हवेचे प्रदूषण अतिधोकादायक पातळीपर्यंत पोहोचले. अगदी मध्यरात्रीही हवेतील धूळ सहज लक्षात यावी इतकी असते. मुंबईची हवा गेल्या आठवड्याभरात चर्चेत आली, पण या देशातील किमान चौदा कोटी नागरिक स्वच्छ हवेच्या मानांकनाच्या दहापट अधिक प्रदूषित हवा शरीरात घेतात, असे काही वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या पाहणीत निष्पन्न झाले होते. जगातील ३० सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील २१



शहरांचा समावेश आहे. हवेतील या प्रदूषणात सर्वाधिक म्हणजे ५१ टक्के वाटा उद्योगांचा, तर २७ टक्के वाहनांचा आणि १७ टक्के पिके जाळण्याचा आहे. या उद्योगांमध्ये मुंबईसारख्या शहरांत बांधकाम उद्योगाचा वाटा मोठा आहे. उद्योगाची भरभराट कितीही आवश्यक असली, तरीही त्यामुळे निर्माण होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी जे कठोर उपाय योजायला हवे होते व संबंधितांना कडक शासन करायला हवे होते, तेथे सरकारी यंत्रणा अपयशी ठरल्या. मोठ्या शहरांमधील दळणवळणाचा प्रश्न सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करून सोडवता येत असला, तरीही तो पूर्णत्वाने सुटत नाही. शहरांवरील लोकसंख्येचा वाढता ताण वाहनांची संख्याही वाढवतो आणि त्यामुळे होणाऱ्या प्रदूषणालाही त्यामुळे मदत होते. पुण्यासारख्या शहरात तर लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे, तर अन्य शहरे आता त्याच मार्गावर चालली आहेत. शहरांच्या विकासात बांधकाम क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते, मात्र त्यामुळे होणारे प्रदूषण तेथेच राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करणारे ठरते. मुंबईतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक अतिधोकादायक पातळीपर्यंत पोहोचला असल्याचे दिसून आले आहे. राज्यात इतर भागांतील चित्र याहून फार वेगळे नाही. कोल्हापूरमध्ये पंचगंगा नदीच्या पात्रात मिसळले जाणारे प्रदूषित रसायनयुक्त औद्योगिक सांडपाणी पंचक्रोशीतील नागरिकांचे जगणे मुश्कील करून टाकत असतानाही, त्याबाबत कठोर कारवाई करण्यात शासकीय यंत्रणा अपयशी ठरली. शहरांच्या परिघावर असलेल्या गावांना तर कुणीच वाली नसतो. ही गावे शहरांच्या प्रदूषणाचे बळी ठरतात, मात्र त्याकडे कुणाचे लक्षच जात नाही. जगण्याची कठीण लढाई लढतानाच दमून जात असलेल्या नागरिकांचे हाल प्रदूषणामुळे अधिकच तीव्र होत आहेत. या प्रश्नावर थातुरमातुर कारवाई करणे हा उपाय असूच शकत नाही. १९८१ मध्ये अस्तित्वात आलेला प्रदूषण नियंत्रण कायदा केवळ कठोर कारवाईअभावी निष्प्रभ ठरला आहे. राजकीय क्षेत्राची अनास्था आणि कारवाईबाबतचा हस्तक्षेप ही त्यामागची कारणे मुंबईत तर कित्येक बांधकाम-स्थळी दिसू शकतात. ऑक्टोबरच्या महिन्यात जर ही स्थिती असेल, तर नंतर येणाऱ्या हिवाळ्यातील अवस्था अधिकच गंभीर होण्याची शक्यता आहे. रस्ते रुंद करणे, उड्डाणपूल बांधणे हे वाहतूक कोंडीचे पर्याय असू शकत नाहीत. वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढते, त्याने हवेच्या प्रदूषणात मोठीच भर पडते. शहरातील वाहनांची संख्या कमी होण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करणे आवश्यक असते. छोट्या शहरांत ती अतिशय बिकट अवस्थेत असते. सार्वजनिक बस व्यवस्थेतील अनेक वाहने कालबाह्य असतानाही वाहतूक व्यवस्थेत असतात. ती सतत नादुरुस्त होतात, त्यामुळे या यंत्रणेवरील नागरिकांचा विश्वास उडतो आणि ते खासगी वाहन घेण्यासाठी प्रवृत्त होतात.

## संपादकीय »

# अर्थचक्रप्रवर्तन

***रुपयाचे व्यवस्थापन सरकारच्या हातात असणे हाच धोक्याचा उगम, हे अभ्यासूपणे सांगणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथाची शताब्दी आता साजरी होते आहे...***

सरकारला प्रश्न विचारण्याचा समृद्ध वारसा आपणा भारतीयांकडे आहे. काही सरकारे प्रश्न विचारू देतात आणि काही सत्ताधारी प्रश्न विचारण्यालाच देशद्रोह समजतात, हा गेल्या सुमारे दीडशे वर्षांतला तपशिलाचा भाग- पण म्हणून भारतीयांनी प्रश्न विचारणे थांबवले नाही. 'रुपया या चलनाचे व्यवस्थापन (ब्रिटिश) सरकारच्या हातात असणे हाच धोक्याचा उगम असल्याने तो बंद करण्याची वेळ आता आलेली नाही काय?' पीएच.डी.साठी सादर केलेल्या प्रबंधातून! हा प्रबंध त्याच वर्षी, लंडनमधील प्रकाशकांकडूनच 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी' या नावाचा ग्रंथ म्हणून प्रकाशितही झाला आणि डॉ. आंबेडकरांच्या पीएच.डी.चे मार्गदर्शक प्रोफेसर एडविन केनन यांनी त्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात, डॉ. आंबेडकरांचे विचार पटत नसूनही हे विचार नवे आहेत, सैद्धान्तिकदृष्ट्या पक्के आहेत आणि लोकांना केंद्रस्थानी मानणारे आहेत एवढे मान्य केले.

**पाकिस्तानातून जो क्रिकेट संघ सध्या भारतात विश्वचषकाच्या एकदिवसीय सामन्यांसाठी आला आहे, त्यात लक्षणीय खेळाडू अजिबात नसूनसुद्धा या संघाची चर्चा अधिक दिसते. ती कशी आणि त्यातून काय उत्पात घडले, याबद्दल ऊहापोह करण्याआधी क्रिकेटप्रेमींसाठी एक वाईट बातमी : आजही आपल्या आसपास, क्रिकेट न पाहणारे लोक आहेत...**

# क्रिकेटच्या चर्चेत राजकारण आणि काळाबाजार!

उदाहरणार्थ आमच्याकडे घरकाम करणारी मेरी. पलीकडच्या खोलीतील टीव्हीवरून येणारे आवाज कुठल्यातरी सामन्याचे आहेत हे तिला स्वयंपाकघरातूनही समजते; पण सामना म्हणजे फुटबॉलचाच, असे तिला वाटते! 'वेस्ट इंडीज म्हणजे क्रिकेट आणि क्रिकेट म्हणजे वेस्ट इंडीज' असे वेस्ट इंडीजचे महान लेखक व्ही. एस. नायपॉल यांनी सुमारे पन्नास वर्षांपूर्वी लिहिले होते. या कॅरिबियन बेटांनी जेव्हा 'व'च्या बाराखडीतल्या वॉरेल, वीक्स आणि वॉलकॉट या तिघा महान क्रिकेटपटूंची जादू पसरवली, तेव्हाचा तो भारलेला काळ! क्रिकेटचा तितका जोश आता तिथे नाही. भारतीय उपखंडाने वेस्ट इंडिजला उंच फटके मारून बाहेर काढले आहे एकेकाळी इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाऐवजी वेस्ट इंडीजने क्रिकेटसत्ता म्हणून नाव कमावले होते, ते पद आता भारताकडे आहे. भारतालाही क्रिकेटचा इतिहास आहेच.



रणजी ट्रॉफीला ज्यांचे नाव देण्यात आले आहे ते सौराष्ट्रातल्या नवानगर संस्थानचे महाराजा रणजीतसिंहजी हे 'एका लहानशा राज्याचे संस्थानिक, पण महान खेळाचे महाराज' आहेत, असे ब्रिटिश पत्रकार ए. जी. गार्डिनर (हे 'अल्फा ऑफ द प्लाउ' या टोपणनावाने लिहीत) यांनी म्हटले होते.

रणजितसिंहांनंतरचे भारतीय क्रिकेट हे 'क्रिकेट विथ विजय मर्चंट' होते. अनेकांना मर्चंट हे भारताचे कर्णधार म्हणून माहीत असतील. मुंबईकर विजय मर्चंट हे एरवी एक कापडगिरणी चालवत होते हे जरी फारजणांना माहीत नसले तरी 'सभ्य क्रिकेटर' म्हणून ते अनेकांना आठवत असतील. क्रिकेट हा आता 'सभ्य गृहस्थांचा खेळ' राहिलेला नाही. प्रतिभावान खेळाडूंसाठी क्रिकेट हाच व्यवसाय असू शकतो, जिथे खरोखर प्रतिभावान आणि अर्थातच शिस्तबद्ध असल्यास चांगले फायदेशीर जीवन जगता येते.

नैसर्गिक प्रतिभेचा शोध घेणारे क्रिकेटदर्दी अनेक आहेत आणि जुन्याजाणत्या खेळाडूंतर्फे चालवल्या जाणाऱ्या अकॅडमींमधून अशा प्रतिभेचे पालनपोषणही होत असते. हा खेळ आबालवृद्धांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाला असल्याने, पैशाचा तोटा नाही.आणि जिथे पैसा आहे तिथे राजकारणीही मागे राहात नाहीत. अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि भावी मुख्यमंत्री राज्य क्रिकेट मंडळांच्या अध्यक्षपदापर्यंत पोहोचले आहेत. हे पदाधिकारी लोक कधी गांभीर्याने क्रिकेट खेळले होते का, की फक्त गल्लीक्रिकेट, सॉफ्ट-बॉल क्रिकेट एवढ्यावरच त्यांची मजल होती हे कुणाला माहीत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मनोज जरांगेंच्या मागणीला रामदास कदमांचा थेट विरोध!

## एकही मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही : कदम

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक झाले आहेत. ते राज्यात विविध ठिकाणी जाऊन जाहीरसभा घेत आहेत. त्यांच्या सभेला मोठ्या संख्येनं लोक जमा होत आहेत. अशी एकंदरीत परिस्थिती असताना भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी कुणबी प्रमाणपत्र घेण्यास विरोध केला आहे.**





९६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा आहे. कुठलाच मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही. मीही आयुष्यभर कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही," असं वक्तव्य नारायण राणेंनी केलं. यानंतर आता शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनीही कुणबी प्रमाणपत्राला विरोध केला आहे. सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, या मनोज जरांगे यांच्या मागणीला माझी मान्यता नाही. मी त्यांच्या विरोधातला आहे. कोकणातला एकही मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही, हे मी दाव्याने सांगू शकतो, असं वक्तव्य रामदास कदम यांनी केलं आहे. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलत होते.

मराठा आरक्षणावर भाष्य करताना रामदास कदम म्हणाले, "सरसकट सगळ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, ही मनोज जरांगेंची जी मागणी आहे, त्याला माझी मान्यता नाही. मी त्या मागणीच्या विरोधातला आहे. मला माहीत आहे, विदर्भात कुणबी आणि मराठ्यात सर्व व्यवहार चालतात. पण कोकणात कुणबी आणि मराठा यांच्यात रोटी-बेटीचा व्यवहार चालत नाही, याची कल्पना मनोज जरांगेंना नाही. त्यांचा सर्व महाराष्ट्राचा आणि कोकणाचा तेवढा अभ्यास नाही. त्यामुळे कोकणातला एकही मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही, हे मी दाव्याने सांगतो. मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना नारायण राणे म्हणाले, "मराठा आणि कुणबींमध्ये फरक आहे. जरांगे-पाटील मराठा आणि कुणबी एकच असल्याचं सांगतात. पण, तसं काही नाही. जरांगे-पाटलांनी जातीचा आणि घटनेचा अभ्यास करावा. मी मराठा आरक्षणाचा अभ्यास केला आहे. मात्र, जरांगे-पाटील कुणबी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय राहणार नाही, असं बोलत आहेत. मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्राची गरज नाही. मी मराठा असून, आयुष्यभर कधीच कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही. ९६ कुळी आणि कुणबी मराठा वेगळा आहे.

### ही केवळ मागणी मनोज जरांगेंची

» मराठा आरक्षणावर भाष्य करताना रामदास कदम म्हणाले, "सरसकट सगळ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, ही मनोज जरांगेंची जी मागणी आहे, त्याला माझी मान्यता नाही. मी त्या मागणीच्या विरोधातला आहे. मला माहीत आहे, विदर्भात कुणबी आणि मराठ्यात सर्व व्यवहार चालतात. पण कोकणात कुणबी आणि मराठा यांच्यात रोटी-बेटीचा व्यवहार चालत नाही, याची कल्पना मनोज जरांगेंना नाही. त्यांचा सर्व महाराष्ट्राचा आणि कोकणाचा तेवढा अभ्यास नाही. त्यामुळे कोकणातला एकही मराठा कुणबी प्रमाणपत्र घेणार नाही, हे मी दाव्याने सांगतो.

---

# भाजपा म्हणजे काखेत कळसा आणि गावाला वळसा!

## कंत्राटीभरतीवरून सुप्रिया सुळेंचा फडणवीसांवर हल्लाबोल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कंत्राटी नोकरभरतीवरून राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. राज्यातील परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी आंदोलन केल्यानंतर राज्य सरकारने कंत्राटी नोकर भरतीचा जीआर मागे घेतला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेत याबाबतची घोषणा केली.**

दरम्यान, त्यांनी कंत्राटी नोकर भरतीचं पाप महाविकास आघाडीचं आहे. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी माफी मागावी. त्यांनी माफी मागितली नाही तर आमच्या पक्षाकडून त्यांना उघडं करू, अशा शब्दांत फडणवीसांनी टीका केली. देवेंद्र फडणवीसांच्या टीकेला आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

सुप्रिया सुळे यांनी मंत्र्यांची यादी जाहीर करत फडणवीसांवर हल्लाबोल केला. 'एक्स' खात्यावर (पूर्वीचे ट्विटर) लिहिलेल्या पोस्टमध्ये सुप्रिया सुळे म्हणाल्या, "भाजपा म्हणजे 'काखेत कळसा आणि गावाला वळसा' आहे. माफीनामा...! माफीनामा...! असे ओरडत भाजपाने ढोंगीपणा करून जनतेची दिशाभूल करणे अगोदर बंद करावे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने आपल्या कार्यकाळात कधीही कंत्राटी तत्वावर कार्यकारी पदे भरली नव्हती. कंत्राटी पद्धत कुणी सुरू केली? याचा शोध भाजपाने जरुर घ्यावा. राज्यातील विद्यार्थी आणि तरुणांनी संघटीतपणे केलेल्या विरोधापुढे हे सरकार झुकले आहे. आता आपले अपयश लपवण्यासाठी माफिनाम्याचे खूळ भाजपाने काढले आहे. उप-उपमुख्यमंत्री महोदयांना जुने संदर्भ काढून आपल्या चुकांचे खापर पुर्वसूरींवर फोडायची खोड आहे. उगाच वडाची साल पिंपळाला लावण्याचे उद्योग करण्यापेक्षा ज्यांच्या मांडीला मांडी लावून सरकार चालवता त्यांच्याशी दोन शब्द बोलून घेतले असते तरी आपण हे 'हवाबाण' सोडण्याची हिंमत केली नसती," असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या. कंत्राटी भरतीचा निर्णय २०११ व २०२१ सालच्या मंत्रिमंडळाने केला म्हणायचं आणि दुसरीकडे त्याच मंत्रिमंडळातील मंत्र्यांसोबत सत्ता उपभोगायची. या स्वार्थासाठी राजकीय पोळी भाजण्याच्या भाजपा वृत्तीचे कार्ड महाराष्ट्राच्या जनतेपुढे मुळीच चालणार नाही. भाजपाच्या नेत्यांना संदर्भ आठवत नसतील तर पुढील यादीतील नेत्यांना संपर्क साधावा," अशी टीका सुप्रिया सुळेंनी केली.



### कंत्राटी पद्धत कुणी सुरु केली?

» "कंत्राटी पद्धत कुणी सुरू केली? याचा शोध भाजपाने जरुर घ्यावा. राज्यातील विद्यार्थी आणि तरुणांनी संघटीतपणे केलेल्या विरोधापुढे हे सरकार झुकले आहे. आता आपले अपयश लपवण्यासाठी माफिनाम्याचे खूळ भाजपाने काढले आहे. उप-उपमुख्यमंत्री महोदयांना जुने संदर्भ काढून आपल्या चुकांचे खापर पुर्वसूरींवर फोडायची खोड आहे. उगाच वडाची साल पिंपळाला लावण्याचे उद्योग करण्यापेक्षा ज्यांच्या मांडीला मांडी लावून सरकार चालवता त्यांच्याशी दोन शब्द बोलून घेतले असते तरी आपण हे 'हवाबाण' सोडण्याची हिंमत केली नसती," असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# भारताने कॅनडाच्या 41 अधिकाऱ्यांना 20 ऑक्टोबपर्यंत देश सोडण्यास सांगितले!

## अमेरिकेने केली काळजी व्यक्त; इंग्लंडचा विरोध

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कॅनडात खालिस्तानी फुटीरतावादी हरदीप सिंह निज्जरच्या हत्येनंतर कॅनडा आणि कॅनडातील संबंध कमालीचे तणावपूर्ण झाले. अशातच भारताने कॅनडाच्या ४१ अधिकाऱ्यांना २० ऑक्टोबपर्यंत भारत सोडायला सांगितलं. यानंतर कॅनडाने त्यांच्या ४१ अधिकाऱ्यांना सहकुटुंब मायदेशी परत बोलावलं. यावर अमेरिकेने प्रतिक्रिया देत काळजी व्यक्त केली आहे.**



अमेरिकेचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर म्हणाले, "भारताने कॅनडाच्या परराष्ट्र अधिकाऱ्यांना देश सोडून जाण्यास सांगितल्यानंतर कॅनडाचे अनेक अधिकारी भारत सोडून मायदेशी परतले. यामुळे आम्ही काळजीत आहोत. अमेरिकेने भारताला कॅनडाच्या तपासात सहकार्य करण्याचं आवाहन केलं. मतभेद संपवण्यासाठी परराष्ट्र खात्याचे अधिकारी आपआपल्या ठिकाणी असणं गरजेचं आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. "भारताने कॅनडाच्या अधिकाऱ्यांना देश सोडून जाण्यास सांगू नये आणि कॅनडाच्या तपासात सहकार्य करावं, अशी विनंती आम्ही भारत सरकारला केली आहे," असंही मिलर यांनी नमूद केलं. यावेळी अमेरिकेने १९६२ च्या 'व्हिएन्ना कन्व्हेन्शन'चा उल्लेख करत भारताने याचं पालन करावं, असंही म्हटलं.

भारताने भारतात असलेल्या कॅनडाच्या ४१ अधिकाऱ्यांना २० ऑक्टोबपर्यंत भारत सोडायला सांगितलं होतं. त्याची कल्पना आम्हाला देण्यात आली होती. त्यामुळे भारतातल्या ४१ कॅनडाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबासह देश सोडला आहे. खालिस्तानी दहशतवादी हरदीप सिंह निज्जरची या वर्षी जूनमध्ये सर्रे शहरातील एका गुरूद्वारात हत्या करण्यात आली. या हत्येनंतर कॅनडात राहणाऱ्या खालिस्तानी समर्तकांनी कॅनडा सरकारवर दबाव आणण्यास सुरूवात केली. त्यांचे म्हणणे होते की या हत्येमागे भारताचा हात आहे. यानंतर सप्टेंबरमध्ये कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी संसदेत येत निज्जर यांच्या हत्येचा आरोप भारतावर केला. तसेच ओटावामधील भारताच्या वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांना देश सोडण्याचे आदेश दिले भारताने ट्रुडो यांचे हे दावे फेटाळून लावले होते. त्यानंतर भारतानेही प्रत्युत्तर देण्यास सुरूवात केली. कॅनडाच्या अनेक राजनैतिक अधिकाऱ्यांना त्यांनी देश सोडण्याचे आदेश दिले. यानंतरच भारत आणि कॅनडा यांच्यातील तणाव वाढण्यास सुरूवात झाली. यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात बातमी आली की भारताने कॅनडाच्या ४१ राजनैतिक अधिकाऱ्यांना देश सोडण्याचे आदेश दिले. भारतात कॅनडाचे एकूण मिळून ६२ राजनैतिक अधिकारी आहेत.

### व्हिएन्ना कन्व्हेन्शन'चं पालन करावं

भारताने १९६२ च्या 'व्हिएन्ना कन्व्हेन्शन'चं पालन करावं, असंही इग्लंडने नमूद केलं. परराष्ट्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे विशेषाधिकार काढून घेण्याच्या मुद्द्यावर इग्लंड म्हणाले, "सर्व देशांनी १९६२ च्या 'व्हिएन्ना कन्व्हेन्शन'चं पालन करावं. परराष्ट्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे विशेषाधिकार आणि सुरक्षा काढून टाकणं १९६२ च्या 'व्हिएन्ना कन्व्हेन्शन'च्या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीला धरून नाही. भारताने कॅनडाच्या ४१ अधिकाऱ्यांना २० ऑक्टोबपर्यंत भारत सोडायला सांगितलं. यानंतर कॅनडाने त्यांच्या ४१ अधिकाऱ्यांना मायदेशी परत बोलावलं. या घडामोडींनंतर आता इंग्लंडने भारताच्या या निर्णयाला विरोध केला आहे.

# अखिलेश यादव काँग्रेसवर भडकले!

## षडयंत्र रचू नका, आघाडी नको तर सांगा

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजप विरोधात विरोधी पक्षांनी इंडिया आघाडी स्थापन केली आहे. मात्र आघाडीतील पक्षांच्या नेत्यांमधील 'मनभेद' वारंवार चव्हाट्यावर आलेले आहेत. आता मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने आघाडी केली नसल्याने समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव भडकले आहेत.**



काँग्रेसवर हल्लाबोल करत षडयंत्र रचू नका, आमच्यासोबत आघाडी करायची नसेल तर स्पष्ट सांगा, असा इशारा दिला आहे. अखिलेश यादव म्हणाले की, "काँग्रेसने आमच्यासोबत युती केली नाही तर आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला पराभूत करण्यासाठी आम्ही आमची तयारी करू. मध्य प्रदेशमध्ये काँग्रेससोबत आघाडी होणार नव्हती तर आमच्या नेत्यांना का बोलावण्यात आले हे काँग्रेसने स्पष्ट करावे, असेही त्यांनी सुनावले. इंडिया आघाडी ही लोकसभा निवडणुकीसाठी आहे, राज्यांसाठी नाही, असे स्पष्टपणे सांगायला हवे होते; पण आमच्या नेत्यांना बोलावून आमच्याशी चर्चा करून जागांची संपूर्ण माहिती घेण्यात आली. लोकसभा निवडणुकीत आघाडी करायची की नाही, हे काँग्रेसने स्पष्टपणे सांगावे, असे ते म्हणाले. त्यांनी नकार दिल्यास भाजपला पराभूत करण्यासाठी आमची तयारी करू. काँग्रेसने आमच्याविरुद्ध षडयंत्र रचू नये, असे आवाहनही त्यांनी केले. जेव्हा काँग्रेस कमकुवत होईल तेव्हा समाजवाद्यांची गरज भासेल, या समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांच्या विधानाचे स्मरणही त्यांनी यावेळी करुन दिले. यापूर्वी काँग्रेस नेते अजय राय यांनी समाजवादी पार्टीवर बोचरी टीका केली होती. ज्याला अखिलेश यादव यांनी चोख प्रत्युत्तर दिले होते. तेव्हापासून विरोधी पक्ष भारतातील सपाच्या उपस्थितीवर प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

# स्मृती इराणींवर काँग्रेसचा हल्लाबोल!

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

जागतिक उपासमार निर्देशांक अर्थात GLOBAL HUNGER INDEX 2023 मध्ये भारताची झालेली घसरण सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. १२५ देशांच्या या यादीत भारताचं स्थान १११वं आहे. गेल्या वर्षी भारत यादीत १०७व्या स्थानावर होता. या वर्षी त्यातही घसरण होत १११व्या स्थानी भारताची घसरण झाली आहे.


त्यावरून विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केलं असताना दुसरीकडे सत्ताधारी पक्षाकडून हा निर्देशांकच चुकीच्या पद्धतीने काढण्यात येत असल्याची सारवासारव केली जात आहे. त्यावरून आता काँग्रेसनं सत्ताधारी पक्षावर टीका केली आहे. स्मृती इराणी यांनी यासंदर्भात केलेल्या एका विधानावर काँग्रेसकडून तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. शुक्रवारी हैदराबादमधील एका कार्यक्रमात बोलताना केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी केलेल्या एका विधानावरून काँग्रेसनं आक्रमक भूमिका घेतली आहे. जागतिक उपासमार निर्देशांकाबाबत स्मृती इराणी यांनी या कार्यक्रमात खिल्ली उडणवारं विधान केलं. "काही निर्देशांक जाणून बुजून भारतातील खरी परिस्थिती दाखवत नाहीत. हे लोक भारतात १४० कोटींच्या लोकसंख्येपैकी ३ हजार लोकांना फोन करून विचारतात की तुम्ही उपाशी आहात का? त्यावरून ते हे निर्देशांक बनवतात", असं स्मृती इराणी या व्हिडीओत बोलताना दिसत आहे.


# नवरात्रीचा आठवा दिवस महागौरी देवीचा!

नवरात्रीचा आठवा दिवस माँ दुर्गेची आठवी शक्ती महागौरीची पूजा केली जाते. महागौरी देवीची यथायोग्य पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटे दूर होतात आणि मातेचा आशीर्वाद प्राप्त होतो. चला जाणून घेऊया चैत्र नवरात्रीच्या आठव्या दिवशी पूजा, आरती आणि मंत्र कसे करावे.माँ दुर्गेची आठवी शक्ती महागौरीची पूजा केली जाते. नवरात्रीच्या आठव्या दिवसाच्या पूजेला विशेष महत्त्व आहे, या दिवशी कन्यापूजाही केली जाते. मातेचे काही भक्त ज्यांना पूर्ण ९ दिवस उपवास करता येत नाहीत, ते प्रतिपदा आणि अष्टमी तिथीला उपवास करतात. देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की आठव्या दिवशीची उपासना माँ दुर्गेची मूळ भावना प्रतिबिंबित करते आणि महागौरी नेहमी महादेवाच्या बरोबर राहते, म्हणून मातेचे एक नाव शिव आहे. महागौरीचे पूजन केल्याने सोमचक्र जागृत होते आणि तिच्या कृपेने प्रत्येक अशक्य कार्य पूर्ण होते. जाणून घेऊया माँ महागौरीचे रूप, नैवेद्य, आरती आणि मंत्र...

## माता महागौरीचे रूप असे

» देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की माता महागौरीचे सर्व कपडे आणि दागिने पांढरे आहेत, म्हणून मातेला श्वेतांबरधारा असेही म्हणतात. त्यांच्या तपश्चर्येने त्यांना गौर वर्णाची प्राप्ती झाली होती. जन्माच्या वेळी ती आठ वर्षांची होती, त्यामुळे नवरात्रीच्या आठव्या दिवशी तिची पूजा केली जाते. त्यांच्या भक्तांसाठी ते अन्नपूर्णेचे रूप आहे. ती संपत्ती, वैभव आणि आनंद आणि शांतीची प्रमुख देवी आहे. सांसारिक रूपात त्यांचे रूप अतिशय तेजस्वी, कोमल, गोरे रंगाचे आणि शुभ्र वस्त्रे परिधान केलेले असते. देवीच्या एका हातात त्रिशूळ आणि दुसऱ्या हातात डमरू आहे. एक हात अभय आणि दुसरा हात वरमुद्रामध्ये आहे. देवी महागौरीला गाणे आणि संगीत आवडते आणि ती पांढऱ्या बैलावर स्वार होते. अष्टमीला मुलींची पूजा करण्याचीही परंपरा आहे. मात्र, काही लोक नवमीच्या दिवशी कन्येची पूजाही करतात. पण, अष्टमीच्या दिवशी कन्येची पूजा करणेही उत्तम. मुलींची संख्या 9 असल्यास उत्तम, अन्यथा पूजा दोन मुलींसोबतही करता येते. मुलींसोबत लंगुरा (बटूक भैरव) ही असावा. मुलींना घरी बोलावून त्यांचे पाय धुवून कुंकुम तिलक लावावा आणि नंतर पूजेमध्ये मुलींना हलवा, हरभरा, भाजी, पुरी इत्यादी वस्तू ठेवाव्यात आणि त्यांच्या क्षमतेनुसार दक्षिणाही द्यावी. यानंतर, संपूर्ण कुटुंबाच्या चरणांना स्पर्श करा आणि मातेचा जयजयकार करताना मुलींना निरोप द्या.





## महागौरी हे नाव कसे पडले (माँ महागौरीची कथा)

» देवी भागवत पुराणात असे सांगितले आहे की, देवी पार्वतीचा जन्म राजा हिमालयापासून झाला होता. आईला तिच्या मागील जन्माच्या घटनांची जाणीव झाली जेव्हा ती फक्त 8 वर्षांची होती. वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी माता पार्वतीने भगवान शिवाला पती म्हणून प्राप्त करण्यासाठी तपश्चर्या सुरू केली. त्यामुळे नवरात्रीच्या अष्टमी तिथीला महागौरीची पूजा केली जाते. तपश्चर्येदरम्यान मातेने केवळ हवा पिऊन तपश्चर्या सुरू केली. माता पार्वतीने तपश्चर्येने मोठे वैभव प्राप्त केले होते, म्हणून माता पार्वतीचे नाव महागौरी पडले. तपश्चर्येमुळे माता पार्वतीचे शरीर काळे झाले होते. तेव्हा तिच्या तपश्चर्येने प्रसन्न झालेल्या भगवान शिवाने महागौरीला गंगा स्नान करण्यास सांगितले. जेव्हा माता पार्वतीने गंगेत डुबकी घेतली तेव्हा देवीचे एक रूप गडद वर्णाने प्रकट झाले, ज्याला कौशिकी म्हणून ओळखले जात असे आणि दुसरे रूप तेजस्वी चंद्रासारखे दिसले, तिला महागौरी असे म्हणतात. महागौरी आपल्या भक्तांची प्रत्येक इच्छा पूर्ण करते आणि त्यांच्या मार्गात येणारे अडथळे दूर करते. आईच्या कृपेने धन आणि धान्याची कधीच कमतरता भासत नाही.

## माँ महागौरी पूजा विधि

» नवरात्रीच्या अष्टमी तिथीचीही इतर तिथींप्रमाणे पूजा केली जाते. ज्याप्रमाणे सप्तमी तिथीला शास्त्रीय पद्धतीने मातेची पूजा केली जाते, त्याचप्रमाणे अष्टमी तिथीलाही मातेची पूजा केली जाईल. या दिवशी देशी तुपाचा दिवा लावताना आईच्या कल्याणकारी मंत्राचा जप ओम देवी महागोरियाय नमः आणि मातेला लाल चुनरी अर्पण करा. यानंतर रोळी, अक्षता, पांढरी फुले, नारळाची मिठाई इत्यादी पूजा साहित्य अर्पण करावे. अग्यारी करत असाल तर रोज चार लवंगा, बताशा, वेलची, हवन साहित्य इ. यानंतर संपूर्ण कुटुंबासह कापूर किंवा दिव्याने महागौरी आरती करा आणि मातेची स्तुती करा. यानंतर दुर्गा मंत्र, दुर्गा चालीसा, दुर्गा सप्तशती इत्यादी पठण करा आणि संध्याकाळी पूजा देखील करा.

# क्लासेनची 'क्लासिक' धुलाई!

## » इंग्लंडचे लोटांगण, द. आफ्रिकेचा 229 धावांनी विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**यंदाच्या वन-डे विश्वचषक स्पर्धेत गतविजेत्या इंग्लंडची कामगिरी अपेक्षाप्रमाणे झालेली नाही. आज दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ४०० धावांचा पाठलाग करताना इंग्लंडने सपशेल लोटांगण घातले. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर इंग्लंडने सुमार कामगिरी केली. यामुळे दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा डाव १७० धावांवर गुंडाळत २२९ धावांनी मोठा विजय मिळवला. या नामुष्कीजनक पराभवामुळे इंग्लंडचा स्पर्धेतील प्रवास खडतर बनला आहे.**

इंग्लंडने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. हेनरिक क्लासेनने धडाकेबाज शतक केले. रॅसी व्हॅन डर डुसेन, रीझा हेंड्रिक्स आणि मार्को जॅनसेन यांनी अर्धशतके झळकावली. क्लासेनने ६७ चेंडूत १०९ धावा केल्या. त्याने १२ चौकार आणि ४ षटकार मारले. हेंड्रिक्सने ७५ चेंडूत ८५ धावा केल्या. त्याने ९ चौकार आणि ३ षटकार मारले. मार्को यानसेनने ४२ चेंडूत ७५ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ३ चौकार आणि ६ षटकार मारले. ड्युसेनने ६१ चेंडूत ६० धावा केल्या. डेव्हिड मिलर ५ धावा करून बाद झाला, क्विंटन डी कॉकने ४ आणि जेराल्ड कोएत्झीने ३ धावा केल्या. केशव महाराज १ धाव घेत नाबाद राहिला. क्लासेन, रॅसी व्हॅन डर डुसेन, रीझा हेंड्रिक्स आणि मार्को जॅनसेन यांच्या धडाकेबाज खेळीमुळे द. आफ्रिकेने ३९९ धावांपर्यंत मजल मारली. इंग्लंडकडून रीस टोपलीने तीन बळी घेतले. गस ॲटिन्सन आणि आदिल रशीदने प्रत्येकी दोन गडी बाद केले. दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात खराब झाली. इंग्लंडने ६ षटकात ३ विकेट गमावल्या. इंग्लंडचा सलामीवीर जॉनी बेअरस्टो १२ चेंडूत १० धावा करून बाद झाला. त्याला लुंगी एनगिडीने रॅसी व्हॅन डर डुसेनच्या हाती झेलबाद केले. त्याच्यापाठोपाठ जो रूटही पॅव्हेलियनमध्ये परतला. मार्को यान्सेनच्या चेंडूवर तो डेव्हिड मिलरकरवी झेलबाद झाला. रूटने सहा चेंडूत ३ धावा केल्या. यानंतर सहाव्या षटकात डेव्हिड मलानच्या रूपात इंग्लंडला तिसरा झटका बसला. त्याला मार्को जान्सेनने विकेटकीपर क्विंटन डी कॉक करवी झेलबाद केले. मलानने आपल्या खेळीत ११ चेंडूत ६ धावा केल्या. सामन्याच्या ११ व्या ओव्हरमध्ये जॉस बटलरच्या रूपात इंग्लंडला पाचवा धक्का बसला. त्याला जेराल्डने क्विंटन डी कॉक करवी झेलबाद केले. त्याने आपल्या खेळीत ७ बॉलमध्ये १५ धावा केल्या. याच ओव्हरच्या तिसऱ्या बॉलवर जेराल्डने हॅरी ब्रुकला एलबीडब्ल्यू केले. हॅरीने आपल्या खेळीत २५ बॉलमध्ये १७ धावांची खेळी केली. आफ्रिकेने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना ९ षटकांमध्ये ५० धावांवर इंग्लंडचे ४ फलंदाज बाद झाले. यामध्ये जॉनी बेअरस्टो १०, जो रूट ३, डेव्हिड मलान ६, बेन स्टोक्स ५, जॉस बटलर १५, हॅरी ब्रुक १७, आदिल राशिद १० आणि डेव्हिड विली १२ धावांवर बाद झाले. गस ॲटकिन्सन आणि मार्क वूड यांनी अखेरीस दिलेली झुंज इंग्लंडला सामन्यात विजय मिळवून देवू शकली नाही. ॲटकिन्सन आणि मार्क वूड ३३ चेंडूमध्ये ७० धावांची भागिदारी केली. परंतु, केशव महाराजने गस ॲटकिन्सनला बोल्ड करत इंग्लंडचा डाव १७० धावांवर गुंडाळला. द. आफ्रिकाकडून गोलंदाजीमध्ये जेराल्ड कोएत्झीने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. त्याच्यासह कगिसो रबाडा, मार्को जान्सेन यांनी प्रत्येकी २ तर कगिसो रबाडा आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. या सामन्यात वर्ल्ड कपमध्ये इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम दक्षिण आफ्रिकेने केला. त्यांनी पाकिस्तानचा विक्रम मोडीत काढला. पाकिस्तानने २०१९ मध्ये आठ विकेट्सवर ३४८ धावा केल्या होत्या. एवढेच नाही तर वनडे क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्धची ही कोणत्याही संघाची सर्वात मोठी धावसंख्या आहे. या बाबतीत दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडला मागे टाकले. २०१५ मध्ये न्यूझीलंडने ओव्हलवर पाच विकेट्सवर ३९८ धावा केल्या होत्या.



### वॉर्नर आणि मार्शने केला नवा विक्रम

» दक्षिण आफ्रिकेकडून हेनरिक क्लासेनने धडाकेबाज शतक केले. रॅसी व्हॅन डर डुसेन, रीझा हेंड्रिक्स आणि मार्को जॅनसेन यांनी अर्धशतके झळकावली. क्लासेनने ६७ चेंडूत १०९ धावा केल्या. त्याने १२ चौकार आणि ४ षटकार मारले. हेंड्रिक्सने ७५ चेंडूत ८५ धावा केल्या. त्याने ९ चौकार आणि ३ षटकार मारले. मार्को यानसेनने ४२ चेंडूत ७५ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ३ चौकार आणि ६ षटकार मारले. ड्युसेनने ६१ चेंडूत ८ चौकारांच्या मदतीने ६० धावा केल्या. डेव्हिड मिलर ५ धावा करून बाद झाला, क्विंटन डी कॉकने ४ आणि जेराल्ड कोएत्झीने ३ धावा केल्या. केशव महाराज १ धाव घेत नाबाद राहिला. इंग्लंडकडून रीस टोपलीने तीन बळी घेतले.

# श्रीलंकेने उघडले विजयाचे खाते!

## » नेदरलँड्सचा पाच विकेट्सनी उडविला धुव्वा

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीलंकेने नेदरलँड्सचा ५ राखून पराभव केला. लखनऊच्या एकना स्टेडियमवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना नेदरलँड्सने २६२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेने पाच गडी गमावून २६३ धावा केल्या आणि स्पर्धेतील पहिला विजय मिळवला. श्रीलंकेच्या विजयाचा हिरो सदिरा समरविक्रमा ठरला. समरविक्रमाने १०७ चेंडूत ९१ धावा करून नाबाद परतला. त्याने आपल्या खेळीत ७ चौकार मारले.**



नेदरलँड्ससाठी आर्यन दत्त हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. आर्यन दत्तने १० षटकांत ४४ धावांत ३ गडी बाद केले. याशिवाय पॉल वॉन मीकेरेन आणि कॉलिन अकरमन यांना १-१ विकेट मिळाली. तत्पूर्वी, नेदरलँडचा कर्णधार स्कॉट एडवर्डसने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला होता. एकदिवसीय विश्वचषक २०२३ मधील श्रीलंका संघाचा हा पहिला विजय आहे. या विश्वचषकात आपला पहिला सामना जिंकणारा श्रीलंका हा शेवटचा संघ आहे. श्रीलंकेपूर्वी उर्वरित नऊ संघांनी किमान एक तरी सामना जिंकला होता. आता श्रीलंकेनेही एक सामना जिंकला आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना नेदरलँड्सचा डाव ४९.४ षटकांत सर्वबाद २६२ धावांवर गडगडला. एकवेळ नेदरलँड्स संघाने ९१ धावांत ६ विकेट्स गमावल्या होत्या. मात्र, यानंतर सायब्रँड एंजेलब्रेक्ट आणि लोगन व्हॅन बीक यांच्या १३५ धावांच्या भागीदारीने डच संघाला मजबूत स्थितीत आणले. विश्वचषकातील सातव्या विकेट्ससाठी ही सर्वात मोठी भागीदारी ठरली. सायब्रँडने ८२ चेंडूत चार चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ७० धावा केल्या, तर व्हॅन बीकने ७५ चेंडूत एक चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ५९ धावा केल्या. श्रीलंकेकडून दिलशान मदुशंका आणि कसून राजिताने प्रत्येकी चार गडी बाद केले. प्रत्युत्तरात श्रीलंकेच्या संघाची सुरुवात डळमळीत झाली. ५२ धावांवर कुसल परेरा आणि कुसल मेंडिसच्या रूपाने दोन मोठ्या विकेट पडल्या होत्या. मात्र, पथुम निसांकाने ५४ धावांची खेळी खेळली. यानंतर सदिरा समरविक्रमाने डावाची धुरा सांभाळत नाबाद ९१ धावा केल्या. चरित असलंकाने सदिराला साथ दिली आणि ४४ धावांची खेळी केली. शेवटी धनंजय डी सिल्वाने 30 धावा करत संघाचा विजय निश्चित केला.

# मार्क चॅपमनने केली हाँगकाँगपासून सुरुवात

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

हाँगकाँगचा क्रिकेट संघ आहे पण तो प्रामुख्याने तिथे स्थायिक झालेल्या स्थलांतरितांचा आहे. पण हाँगकाँगकडून खेळलेला एक खेळाडू यंदाच्या वर्ल्डकपमध्ये खेळतो आहे. न्यूझीलंडचा फिनिशर या भूमिकेत तो आहे. त्याचं नाव आहे-मार्क चॅपमन. मार्कची आई हाँगकाँगची तर वडील न्यूझीलंडचे. मार्कचं कुटुंब हाँगकाँगमध्ये होतं. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचं शिक्षण पूर्ण करता करता मार्कने क्रिकेट खेळण्याची आवड जोपासली. क्रिकेट उपकरणांची निर्मिती करणारी ईएससीयू ही कंपनी त्याने सुरू केली.

याच काळात न्यूझीलंडमध्ये खेळायची संधी मिळाली. वडील न्यूझीलंडचे असल्याने मार्कला न्यूझीलंडचा नागरिक होणं सोपं गेलं. हाँगकाँग हा आयसीसीच्या श्रेणीत असोसिएट देश आहे. या संघांच्या आपापसात लढती होतात. वर्ल्डकपसाठी पात्र ठरण्यासाठी त्यांना पात्रता फेरी स्पर्धेत खेळावं लागतं. मोठ्या संघांविरुद्ध खेळण्याची संधी अभावानेच मिळते. जेव्हाही मोठ्या स्पर्धेत खेळायची संधी मिळते तेव्हा अनुभव कमी असल्यामुळे त्यांना प्राथमिक फेरीत गाशा गुंडाळावा लागतो. या संघांमधले अनेक खेळाडू नोकरी-व्यवसाय सांभाळून खेळत असतात. क्रिकेट हा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत नसतो. बोर्डाची आर्थिक ताकदही मर्यादित असल्याने फक्त क्रिकेटपटू राहून उदरनिर्वाह चालत नाही. चांगल्या दर्जाचं क्रिकेट नियमितपणे खेळता यावं यासाठी चॅपमनने न्यूझीलंडला जाण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडला जाण्यापूर्वी मार्क हाँगकाँगकडून खेळत होता.